Jagdamba Education Society's

**Jagdamba Education Society's**

# Santosh N. Darade Polytechnic

**At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401**

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 18/01/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

### News Paper Name: आपलं महानगर

**Page No. 04**

# दिनविशेष



## लेखक, शिक्षणतज्ज्ञ विठ्ठल दत्तात्रय घाटे

विठ्ठल घाटे हे मराठी लेखक व शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांचा जन्म १८ जानेवारी १८९५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील घोसपुरी या गावी झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध कवी होते. विठ्ठल घाटे यांचे प्राथमिक शिक्षण नगरला व माध्यमिक, तसेच उच्च शिक्षण इंदूर येथे झाले. मुंबई व लंडन येथील शिक्षणशास्त्राच्या पदव्या त्यांनी मिळविल्या. मुंबई इलाख्याच्या शिक्षणखात्यात विविध अधिकारपदांवर नोकरी करून शेवटी डेप्युटी डिरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन या पदावरून निवृत्त झाले. त्यांनी शालेय पुस्तके, शैक्षणिक ग्रंथ, कविता, व्यक्तिचित्रे, ललित निबंध, आत्मवृत्त, नाटक इ. विविध प्रकारचे लेखन केले.

शिक्षण आणि व्यवसाय यांच्या निमित्ताने महाराष्ट्र, माळवा, गुजरात, कर्नाटक अशा विविध प्रदेशांत तसेच परदेशातही वास्तव्य घडल्याने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला बहुरंगीपणा आला. त्यांच्या जीवनविषयक व्यापक आणि समृद्ध जाणिवांचा प्रत्यय त्यांच्या लेखनात येतो. 'रविकिरण मंडळा'चे ते सदस्य होते. प्रथम 'मधुकर' या टोपणनावाने ते कविता करीत. 'मधु-माधव' या संग्रहात माधव ज्युलिअन यांच्याबरोबर त्यांच्याही कविता संग्रहीत झालेल्या आहेत. 'नाट्यरूप महाराष्ट्र', 'नाना देशांतील नाना लोक' ही शालेय पुस्तके. 'काही म्हातारे व एक म्हातारी', 'पांढरे केस', 'हिरवी मने' हे व्यक्तिचित्रांचे संग्रह. 'मनोगते', 'विचारविलसिते' हे ललित-वैचारिक निबंधाचे संग्रह. 'दिवस असे होते' हे आत्मचरित्र, ही त्यांची ग्रंथसंपदा विशेष उल्लेखनीय आहे. त्यांचे उत्कट पण दिलखुलास व्यक्तिमत्त्व, सौंदर्यदृष्टी, इतिहासप्रेम, जीवनाविषयीची आंतरिक ओढ आणि अभिजात रसिकता यांचा त्यात मिलाफ झालेला दिसतो. त्यांची गद्यशैलीही सुटसुटीत, रसपूर्ण आणि लयदार होती. १९५३ साली अहमदाबाद येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा बहुमान त्यांना लाभला होता. अशा या ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञाचे ३ मे १९७८ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Jan 18, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

Jagdamba Education Society's

**LIBRARIAN**
**MR.U.D. MULANI**
**SND POLYTECHNIC**
**YEOLA-423401**

**PRINCIPAL**
**PROF.U.B JADHAV**
**SND POLYTECHNIC**
**YEOLA-423401**